दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार




• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • शुक्रवार दि.१ मे २०२६ • अंक-९९ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# रस्त्यावरचा आवाज थेट विधान परिषदेत!

## प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांचा शिवसेनेत प्रवेश

### विधान परिषदेसाठी बच्चू कडू,नीलम गोऱ्हे यांना संधी; एकनाथ शिंदे यांची अधिकृत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

आंदोलन करणाऱ्यांना सत्तेबाहेर ठेवण्याची परंपरा मोडीत काढत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी खेळी केली आहे. बच्चू कडू यांना शिवसेनेत घेत थेट विधान परिषदेची उमेदवारी देत त्यांनी रस्त्यावरचा आवाज थेट निर्णयप्रक्रियेत आणण्याचा नवा राजकीय प्रयोग केला आहे.या घडामोडीसोबतच शिवसेनेने विधान परिषद निवडणुकीसाठी दोन नावे जाहीर करत राजकीय समीकरणांना वेग दिला. बच्चू कडू यांच्यासह माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना उमेदवारी देण्याची घोषणा स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीला अवघे दोन तास शिल्लक असताना घेतलेल्या या निर्णयाने राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली. शेवटच्या क्षणापर्यंत दुसऱ्या उमेदवाराबाबत सस्पेन्स कायम ठेवत शिंदेंनी आपल्या निर्णयक्षमतेचा ठसा उमटवला.



मुंबईत झालेल्या कार्यक्रमात बच्चू कडूंनी शिवसेनेत प्रवेश करत आपली भूमिका स्पष्ट केली. प्रहार संघटना पुढेही स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून कार्यरत राहणार असली तरी राजकीय लढा शिवसेनेच्या माध्यमातून उभारला जाईल, असे त्यांनी जाहीर केले. शेतकरी, दिव्यांग, कष्टकरी, दलित, शोषित आणि गोरगरीबांच्या प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. पुढील वाटचाल पूर्णपणे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.बच्चू कडू यांची ओळख ही आंदोलनातून उभी राहिलेली आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी काढलेले मोर्चे, दिव्यांगांसाठी उभारलेले आंदोलन, तसेच गोरगरीब, शोषित आणि पीडित घटकांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरून लढा देत त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली, असे शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

बच्चू कडू यांच्या आंदोलनांमुळे सरकारला कर्जमाफीसारखे महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले, याची आठवणही एकनाथ शिंदे यांनी करून दिली. यावेळी बोलताना शिंदेंनी बच्चू कडूंच्या लढाऊ स्वभावाचे कौतुक करत अन्यायाविरुद्ध लढा हा बाळासाहेबांच्या विचारांचा गाभा असल्याचे सांगितले. आपले आणि बच्चू कडू यांचे विचार एकच सर्वसामान्यांना न्याय देणे, असे स्पष्ट करत त्यांनी सामाजिक लढ्याला राजकीय ताकदीची जोड देण्याची गरज अधोरेखित केली. मी एकदा शब्द दिला की तो पाळतो, असे ठामपणे सांगत त्यांनी आपल्या नेतृत्वशैलीवर शिक्कामोर्तब केले.या संपूर्ण घडामोडीतून एक महत्त्वाचा संदेश समोर आला आहे. सामाजिक आंदोलन यशस्वी व्हायचे असेल तर त्याला राजकीय ताकद आवश्यक असते. बच्चू कडूंना थेट विधान परिषदेसाठी संधी देत शिंदेंनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्याला थेट निर्णय प्रक्रियेत स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कार्यकर्ता ते निर्णयकर्ता हा प्रवास प्रत्यक्षात साकारताना दिसत आहे.दरम्यान, प्रहार संघटना स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून कायम राहणार असली तरी ती शिवसेनेशी संलग्न राहील. त्यामुळे रस्त्यावरची ताकद आणि सत्तेची ताकद एकत्र येऊन सामाजिक प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, असे चित्र निर्माण झाले आहे.

बच्चू कडूंनीही हा प्रवेश केवळ उमेदवारीसाठी नसून विचारांच्या एकतेसाठी असल्याचे स्पष्ट केले. माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या अनुभवालाही या निर्णयात महत्त्व देण्यात आले आहे. विधान परिषदेत केलेले त्यांचे काम, महिलांच्या प्रश्नांवर घेतलेली आक्रमक भूमिका आणि संघटनात्मक योगदान लक्षात घेता त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे एका बाजूला आंदोलनातून आलेले नेतृत्व आणि दुसऱ्या बाजूला अनुभवी नेतृत्व असे संतुलन साधण्याचा प्रयत्न दिसून येतो.

अर्ज भरण्याची अंतिम मुदत दुपारी तीन वाजेपर्यंत असताना अखेरच्या दोन तासांत उमेदवारी जाहीर होणे हा राजकीय थरार ठरला. या सर्व घडामोडींमुळे विधान परिषद निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

याच वेळी शिंदेंनी राष्ट्रीय राजकारणावर भाष्य करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करत असल्याचा दावा केला आणि आगामी काळात पश्चिम बंगालचा आसाम मध्ये मोठे राजकीय परिवर्तन होईल, असा विश्वास व्यक्त केला.

एकूणच, बच्चू कडूंचा शिवसेनेत प्रवेश हा केवळ राजकीय घटना न राहता आंदोलनाला थेट सत्तेत स्थान देण्याचा प्रयोग ठरत आहे. एकनाथ शिंदे यांनी या निर्णयातून पारंपरिक राजकारणातील भिंती मोडत कार्यकर्त्यांना थेट निर्णय प्रक्रियेत आणण्याचा नवा मार्ग दाखवला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात आंदोलन ते निर्णय हा नवा अध्याय सुरू झाल्याचे स्पष्ट होत आहे.यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, शिवसेना सचिव संजय मोरे, आमदार मुरजी पटेल आणि शिवसेना आणि प्रहार संघटनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच दिव्यांग बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे 'महाराष्ट्र दिना'निमित्त कामगार आणि पत्रकारांना 'राजा शिवाजी' चित्रपटाची पहिल्या शोची मेजवानी!

**उलवे । प्रतिनिधी**

जागतिक कामगार दिन आणि 'महाराष्ट्र दिना'निमित्त शुक्रवारी (ता. १ मे) आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी कामगार आणि त्याचे कुटुंबीय, तसेच पत्रकारांसाठी 'राजा शिवाजी' या ऐतिहासिक चित्रपटाची अनोखी मेजवानी देण्याचे ठरविले आहे. 'राजा शिवाजी' हा शिवरायांवरील भव्यदिव्य चित्रपट शुक्रवारी (ता. १) प्रदर्शित होत आहे. 'राजा शिवाजी' हा चित्रपट एकाच दिवशी मराठी, हिंदी आणि तेलगू भाषांत प्रदर्शित होत आहे. प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख, संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, फरदिन खान, सलमान खान, सचिन खेडेकर, महेश मांजरेकर, बोमन इराणी अशा कलाकारांचा अभिनय असलेला आणि अजय-अतुल यांचे संगीत लाभलेला हा चित्रपट आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील या ऐतिहासिक चित्रपटाचा पहिला शो पाहण्याची संधी महेंद्रशेठ घरत यांनी कामगार आणि पत्रकारांना महाराष्ट्र दिनी आणि जागतिक कामगार दिनी दिली आहे. त्यामुळे कामगार नेता कसा असावा, तर तो महेंद्रशेठ घरत यांच्यासारखा, अशा भावना कामगारांमधून व्यक्त होत आहेत. 'राजा शिवाजी' चित्रपट पनवेल येथील ओरियन मॉलमध्ये शुक्रवारी (ता. १ मे) सायंकाळी ६.३० चा शो, पीव्हीआर, स्क्रीन-१ वर पाहण्यासाठी कामगार आणि पत्रकारांनी वैभव पाटील (मोबाईल-९८१९३२५५५४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन न्यू मेरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेतर्फे करण्यात आले आहे.




## १२ वीच्या विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली:२ तारखेला होणार निकाल जाहीर



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा १२वीचा निकाल २ मे २०२६ रोजी जाहीर होणार असून, गेल्या अनेक दिवसांपासून निकालाची प्रतीक्षा करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांची ही उत्सुकता आता संपणार आहे. बोर्डाच्या परंपरेनुसार, निकालाच्या एक दिवस आधी अधिकृत सूचना जारी केली जाते आणि त्यानुसार २ मे रोजी सकाळी ११ वाजता मंडळाची पत्रकार परिषद पार पडणार आहे. या परिषदेत निकालाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर, दुपारी १ वाजता बोर्डाच्या वेबसाइटवर निकालाची लिंक सक्रिय केली जाईल, जिथून विद्यार्थ्यांना आपला निकाल ऑनलाइन पाहता येईल.

# सांस्कृतिक कलादर्पण २०२६ पुरस्कार सोहळा दिमाखात संपन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठानतर्फे आयोजित २८ वा सांस्कृतिक कलादर्पण २०२६ गौरव रजनी पुरस्कार सोहळा मंगळवार, २८ एप्रिल रोजी प्रभादेवी येथील रविंद्र नाट्य मंदिरात उत्साहात पार पडला. सायंकाळी ६.३० वाजता सुरू झालेल्या या सोहळ्याला मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकारांची उपस्थिती लाभली.

या वेळी यंदाचा मानाचा सर्वश्रेष्ठ कलागौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता जोशी-सराफ आणि ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांना ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि ज्येष्ठ रंगकर्मी रविंद्र आवटी आणि सांस्कृतिक कलादर्पण अध्यक्ष संस्थापक चंद्रशेखर सांडवे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

नाटक विभागात गोष्ट तिच्या घटस्फोटाची या नाटकाने सर्वोत्कृष्ट नाटकाचा प्रथम पुरस्कार पटकावला, तर फिल्टर कॉफी आणि लागली पैज यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. प्रायोगिक नाटक विभागात इथेच टाका तंबू या नाटकाने बाजी मारली.

मालिका विभागात लक्ष्मी निवास (झी मराठी) या मालिकेला सर्वोत्कृष्ट मालिकेचा पुरस्कार मिळाला, तर लग्नानंतर होईलच प्रेम (स्टार प्रवाह) लक्षवेधी मालिका ठरली.

चित्रपट विभागात आदिशेष या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा किताब पटकावला. तसेच सुबोध भावे, अजिंक्य देव आणि नारायण जाधव यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार विभागून देण्यात आला. मानसी नाईक हिने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा मान पटकावला.



पत्रकारिता विभागात ABP माझा या वृत्तवाहिनीला सर्वोत्कृष्ट न्यूज चॅनेलचा पुरस्कार देण्यात आला. विविध क्षेत्रातील कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि पत्रकार यांना सन्मानित करत हा सोहळा कलाक्षेत्रातील योगदानाची दखल घेणारा ठरला. संपूर्ण कार्यक्रमात रंगतदार सादरीकरणे आणि उत्साही वातावरणामुळे उपस्थित प्रेक्षकांना अविस्मरणीय अनुभव मिळाला.

अंतिम निकाल पुढील प्रमाणे चित्रपट विभाग

१) सर्वोत्कृष्ट चित्रपट ( आदिशेष )

२) सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक ( रमेश मोरे - आदिशेष )

३) सर्वोत्कृष्ट अभिनेता विभागून ( सुबोध भावे - सकाळ तर होऊ द्या, अजिंक्य देव - तु मी आणि अमायरा, नारायण जाधव - गमन )

४) सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ( मानसी नाईक - सकाळ तर होऊ द्या )

५) सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री विभागून ( १- आराधना देशपांडे आदिशेष, २- राजश्री पोतदार - एप्रिल मे ९९ )

६) सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता ( अरुण नलावडे - आदिशेष )

७) सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री ( ईशा डे - गुलकंद )

८) सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता ( समीर चौघुले - गुलकंद )

९) प्रथम पदार्पण ( साजिरी जोशी - एप्रिल मे ९९ )

१०) प्रसाद खानोलकर ( भेरा )

११) सर्वोत्कृष्ट पटकथा ( अमरजित आमले - कुर्ला टू वेंगुर्ला )

१२) सर्वोत्कृष्ट संवाद ( सचिन मोटे - गुलकंद )

१३) सर्वोत्कृष्ट छायांकन ( अपूर्वा शाळीग्राम - एप्रिल मे ९९ )

१४) सर्वोत्कृष्ट संकलन ( सुबोध नारकर - नयन )

१५) सर्वोत्कृष्ट गीतकार ( रविकिरण जावीर - फुला )

१६) सर्वोत्कृष्ट संगीतकार ( समाधान आयवळे - फुला )

१७) सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक ( रोहित राऊत - गुलकंद )

१८) सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका ( वैशाली सामंत - फुला )

१९) सर्वोत्कृष्ट रंगभूषा ( रविंद्र जाधव - छबी )

२०) सर्वोत्कृष्ट कलादिग्दर्शक ( निलेश रसाळ - रिलस्टार )

२१) लक्षवेधी चित्रपट ( फुला )

२२) प्रेक्षक पसंती चित्रपट ( एप्रिल मे ९९ )

# कलंबोली शहरातील अनियमित आणि अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकात तीव्र नाराजी!

## कळंबोली शहराला नियमित आणि नियमित पाणीपुरवठा करण्याची उपमहापौर प्रमिला पाटील यांची मागणी

**पनवेल । प्रतिनिधी**

कलंबोली शहराला गेल्या ८ ते १० दिवसांपासून अत्यंत अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे नागरिकात असंतोष पसरला आहे. तेव्हा कळंबोली शहराला नियमित आणि नागरिकांना पुरेशा पाणी पुरवठा करण्यासाठी अत्यंत तातडीने उपाययोजना यावी अशी मागणी पनवेल महानगर पालिकेच्या उपमहापौर प्रमिला रविशेठ पाटील यांनी पालिकेच्या आयुक्त यांच्याकडे निवेदनाने केली आहे.कलंबोली शहराची एकूण पाणीपुरवठा मागणी सुमारे ३२ चडऊ इतकी असताना प्रत्यक्षात शहरास कधी २० चडऊ कधी २१ चडऊतर काही दिवसांमध्ये केवळ १९ MLD इतकाच पाणीपुरवठा केला जात आहे. या मोठ्या तुटवड्यामुळे कलंबोली शहरातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची तीव्र समस्या निर्माण झाली आहे. पाणीपुरवठा कमी प्रमाणात होत आहेच पण विशेष म्हणजे अनियमित वेळेत होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.अनियमित वेळ आणि अपुरा पाणीपुरवठा यांमुळे कलंबोली शहरातील गृहनिर्माण सोसायट्या व नागरिकांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी खरेदी करावे लागत आहे. टँकरद्वारे पाणी घेण्याची ही परिस्थिती केवळ तात्पुरती नसून सातत्याने निर्माण झाली आहे. गृहनिर्माण सोसायट्यांवर दरमहा अंदाजे ५ लाख ते ७ लाख रुपयांचा मोठा आर्थिक भार पडत आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी नागरिकांना एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागणे ही अत्यंत खेदजनक व चिंताजनक बाब आहे.सदर




विषय हा केवळ प्रशासनिक नसून नागरिकांच्या आरोग्याशी, स्वच्छतेशी आणि दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित आहे. पाणीपुरवठ्याच्या या समस्येमुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून माझ्या प्रभागातील जनसंपर्क कार्यालयात याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. अनेक नागरिकांनी प्रत्यक्ष भेटून तसेच लेखी स्वरूपात या गंभीर समस्येबाबत तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहे.या पार्श्वभूमीवर, आपणास आदेशीत करण्यात येते की, पनवेल महानगरपालिकेमार्फत खारघर शहरात ज्या पद्धतीने टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो, त्याच पद्धतीने कलंबोली शहराकरिता देखील महानगरपालिकेमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा तातडीने / तात्काळ प्रभावाने सुरू करण्यात यावा, जेणेकरून नागरिकांना पाणीपुरवठा विषयी दिलासा मिळेल अशी भावना पालिकेच्या उपमहापौर प्रमिला रविशेठ पाटील यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे. याची प्रत आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीनजी पाटील यांना देण्यात आली आहे.

# लक्ष्मी ऑरगॅनिक प्रकरणावरून कोकणात आंदोलन तीव्र; शंभरावा दिवस पूर्ण

**चिपळूण । सत्यवान विचारे**

कोकणातील पर्यावरण आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आज शंभर दिवस पूर्ण झाले आहेत. लक्ष्मी ऑरगॅनिक प्रकल्पाविरोधात उभ्या राहिलेल्या या आंदोलनात सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

कोकण नागरी संघर्ष समितीचे सदस्य अशोकराव जाधव यांनी सरकारवर गंभीर आरोप करत म्हटले की, कोकणातील निसर्ग आणि स्थानिकांचे जीवन धोक्यात घालणाऱ्या या प्रकल्पाकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. शंभर दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाकडे सरकारने अजूनही ठोस पावले उचललेली नाहीत.

स्थानिक नागरिकांच्या मते, या प्रकल्पामुळे परिसरातील पर्यावरण, शेती आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे प्रकल्प रद्द करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे.

दरम्यान, आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला असून, येत्या काळात मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारण्याची तयारी सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

सरकारकडून अद्याप कोणतीही ठोस प्रतिक्रिया न आल्याने कोकणातील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण अधिकच वाढत आहे.

# खोपोली डम्पिंग ग्राऊंडवरील आगी व शहरातील अतिक्रमणांबाबत पत्रकार समितीची मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा

**खोपोली । प्रतिनिधी**

नगरपरिषद हद्दीत असलेल्या मिळ येथील डम्पिंग ग्राऊंडला वारंवार लागणाऱ्या आगी तसेच शहरातील वाढत्या अतिक्रमणांच्या गंभीर समस्यांबाबत खोपोली पत्रकार समितीने मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याऐवजी तो जाळला जात असल्याचा गंभीर आरोप पत्रकार समितीने केला.

या ठिकाणी बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याने तसेच काही वेळा कार्यरत असूनही त्यातील माहिती उपलब्ध होत नसल्याने कचरा चोरी करणाऱ्यांना मोकळे रान मिळत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

आगीच्या घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर माती व दगड टाकण्यात येत असल्याचेही आढळून आले. विशेष म्हणजे, या डम्पिंग ग्राऊंडवर खोपोली शहराच्या कचऱ्यापेक्षा बाहेरील कंपन्यांचा कचरा मोठ्या प्रमाणात टाकला जात असल्याची बाब समोर आली असून, त्यामुळेच आग लावण्याचे प्रकार घडत आहेत का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.या सर्व प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डम्पिंग ग्राऊंडवर २४ तास नगरपरिषदेचा सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याची मागणी पत्रकार समितीने केली.

तसेच शहरातील बाजारपेठ व मुख्य रस्त्यांवर हातगाड्यांमुळे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असून, प्रशासनाचा कोणताही धाक राहिलेला नसल्याची टीका करण्यात आली. हे अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ते मोकळे करावेत, अशी मागणी करण्यात आली.

घंटागाडी सेवेमध्ये घरातील जुने फर्निचर व गाद्या स्वीकारल्या जात नसल्याने नागरिक अडचणीत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच भंगार विक्रेते कचरा चोरी करत असल्याने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय ठेकेदारांच्या कामांवर देखरेख ठेवणे, कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियमित नोंदवणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करणे या मुद्द्यांवरही चर्चा झाली.या बैठकीस खोपोली पत्रकार समितीचे जयवंत माडपे, अनिल वाघमारे, प्रवीण जाधव, महेबुब जमादार, तय्यब खान, सागर जाधव, शेखर परब, आकाश जाधव, शिवाजी जाधव, मानसी कांबळे, संतोषी म्हात्रे आदी पत्रकार उपस्थित होते.यावेळी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी पत्रकार समितीला लेखी निवेदन सादर करण्याचे आवाहन करत, संबंधित समस्यांवर योग्य तो मार्ग काढण्यात येईल असे आश्वासन दिले व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या.

# दिव्यात रोको वडापावच्या उदघाट्न प्रसंगी लाखोंची बक्षीसे

## बिग बॉस मराठी' सीझन ६ ची विजेती तन्वी कोलते विशेष उपस्थिती

**संतोष पडवळ । ठाणे**

महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीत अग्रस्थानी असलेला वडापाव आता एका कॉर्पोरेट ब्रँडच्या रूपात समोर येत आहे. भारतातील पहिले स्ट्रीट फूड बँड' अशी ओळख निर्माण करणाऱ्या 'रोको वडापाव' आता दिवा शहरवासीयांच्या चवीसाठी सज्ज झाले असून आज महाराष्ट्र व कामगारदिनी भव्यदिव्य उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. दिवा शिवसेना उपशहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश पाटील यांच्या विशेष मार्गदर्शनातून हा नविन व्यवसाय सुरू होत आहे.




वडापावला केवळ एक खाद्यपदार्थ न ठेवता त्याला एक मोठा ब्रँड म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. 'ईट हॉट, हिट हार्ड' असे ब्रीदवाक्य असलेल्या या ब्रँडमुळे स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासोबतच खवय्यांना स्वच्छ आणि चविष्ट वडापाव मिळण्यास मदत होणार आहे. सदर सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'बिग बॉस मराठी' सीझन ६ ची विजेती तन्वी कोलते हिची उपस्थिती असणार आहे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून संध्याकाळी ७:०० वाजता दिवा शीळ रोडवरील 'चंद्रागण रेसिडेन्सी' येथे हा उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. या निमित्ताने दिव्यात वडापावच्या एका नव्या पर्वाची सुरुवात होत असून, परिसरातील नागरिकांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ठाण्यात नालेसफाईच्या कामांचा महापौरांच्या हस्ते शुभारंभ



**संतोष पडवळ । ठाणे**

ठाण्यातील कोपरी परिसरातील नालेसफाईच्या कामाचा शुभारंभ आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते करण्यात आला. ठाणे शहरातील विविध भागातील नालेसफाईच्या कामांना सुरूवात झाली असून आज कोपरी येथील बिम्सनाला येथून नालेसफाईच्या कामास सुरूवात करण्यात आली. पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची साफसफाई होईल या दृष्टीने नियोजन करून कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना महापौरांनी यावेळी दिल्या.

या कार्यक्रमास स्थानिक नगरसेविका मालती पाटील, नम्रता पमनानी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पुरी तसेच नौपाडा-कोपरी प्रभाग समितीतील स्वच्छता निरीक्षक, मुकादम आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर प्रत्यक्ष नाल्याच्या साफसफाईच्या कामाला सुरुवात करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित स्वच्छता आणि देखभाल ठेवण्यावर भर देत नागरिकांनीही स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबाग वडवणी,नवीन जागेत स्थलांतरित

## माजी विद्यार्थी,शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजक यांनी भौतिक सुविधांसाठी शाळेला केली मदत

**वडवणी । प्रतिनिधी**

विद्यार्थी,पालक, शिक्षण प्रेमी यांच्यासाठी,अत्यंत आनंदाची बाब आहे की,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबाग वडवणी ही आता नूतन सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. या प्रवासात शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अनेक माजी विद्यार्थी,प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजकांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे.

शाळा स्मार्ट झाली तर नक्कीच उज्वल भवितव्य असणारी पिढी तयार होईल म्हणून आपण दिलेल्या या मदतीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ आपले ऋणी आहोत.

आमचे प्रेरणास्थान देणगीदार पुढील दानशूर व्यक्तीनी देणगी दिली आहे त्यांची नावे श्री.नागेशभाऊ डिगे नगरसेवक तसेच १) श्री.विनोदशेट असलकर इन्व्हर्टर व बॅटरी २)श्री.भाई उजगरे सामाजिक नेते ११ सीलिंग फॅन ३) श्री.अजय भैरट (युवा उद्योजक) ४ सीसीटीव्ही कॅमेरे ४) श्री.दत्तात्रय टिपरे (सहशिक्षक व माजी विद्यार्थी) १५ खुर्च्या ५) सौ.सीमाताई रामदास आठवले (अध्यक्ष, रिपाई महाराष्ट्र) २००० लिटर पाणी टाकी (०१) ६) श्री.महादेव दादा उजगरे (तालुकाध्यक्ष, रिपाई वडवणी) २००० लिटर पाणी टाकी (०१) ७) श्री.प्रकाश कुरकुटे सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ८) श्री. सुदाम खटावकर सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ९) श्री. भिवराज कोकणे सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) १०)श्री. वैभव बिडकर सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ११) श्री.प्रफुल टकले सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) १२) बालाघाट फिटनेस ग्रुप संपूर्ण लाईट फिटिंगचा खर्च १३) महादेव खुपसे पेंटर व नंदकुमार खुपसे =सर्व शाळेला रंगरंगोटी १४) सुरज टोम्पे सर चौडेश्वरी क्लासेस=सर्व महापुरुष फोटो संच १५) वचिष्ठ अण्णा वरवडे माजी सरपंच जागा उपलब्ध १६) विलास अण्णा ढोले सर्व पाणी बांधकाम साठी पुरवठा १७) कल्याण वारे पिण्याचे पाण्याची सोय विद्यार्थ्यांना कायम १८) गणेश टकले शालेय अध्यक्ष कागद पूर्तता १९) ज्ञानेश्वर रोकडे




महाराष्ट्र कोष्टी समाज अध्यक्ष वडवणी १५x१५ च्या ५ चटाई २०) रामेश्वर पारखे शाळेसाठी संगणक व प्रिन्ट मशीन १, २१) परमेश्वर कुरकुटे २ शिक्षक टेबल, २२) सौ.मिना नवनाथ रोकडे १० खुर्च्या ,२३) गणेश माळवदे १ व्हाईट बोर्ड, २४) लहू खारगे २ साऊंड व २ माईक, २५) ऋषिकेश तेटांबे १ टेबल, २६) कृष्णा महादर २ साऊंड कर्ना २७) शोभाताई खाटवकर तर्फे भाषण डाईस १, २८) तिरुपती ग्रुप ४० लेक्षीम तसेच बालाघाट मॉर्निंग ग्रुप च्या वतीने सर्व शाळा परिसर स्वच्छ, साफसफाई करून दिली.आपल्या सर्वांच्या सहकार्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबाग वडवणी ही आता नूतन सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. या प्रवासात शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अनेक माजी विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजकांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे.

आपण दिलेल्या या मदतीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ आपले ऋणी आहोत.

देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्यांचे हातच घ्यावेत..!


वरील कवितेच्या ओळीतून देणाऱ्याची दान करण्याची वृत्ती आपण स्वीकारावी हा संदेश आपल्याला रामबाग शाळेला मदत केलेल्या दानशूर देणगीदाराकडून मिळतो.

# पुण्यातील अतिक्रमणाचा खेळ चाले राजकारण्यांच्या भरवश्यावर

**।।। अतिक्रमणा बाबत कोर्टाचे आदेश ।। आमदारांनी आणि मंत्र्यांनी अधिवेशनात अतिक्रमणांवर मांडलेला प्रश्न ।। महापालिकेला सर्व आमदार,मंत्री यांनी अतिक्रमणांवर धडाकेबाज कारवाई केली जावी ।। असे सर्व आदेश महापालिका अतिक्रमण विभाग धूडकावत आहे ।। स्थानिक राजकिय लोकांच्या आदेशाने अतिक्रमण कारवाई कशी थांबते ।।**

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे शहरातील अतिक्रमण प्रश्न ऐरणीवर आलेला आहे अतिक्रमण पाडतात ते सरसकट नाही अतिक्रमण पांडवांना राजकिय लोकांचा फोन आला की अतिक्रमण पाडणे थांबत असल्याची स्थिती शहरात आहे शहरातील अतिक्रमण बाबत मागे कोर्टाने एक आदेश दिला होता त्यात म्हटले होते अतिक्रमणांवर सरसकट कायमस्वरूपी कारवाई जो अधिकारी करत नसेल तर त्यांचे पगार थांबविण्याचे आदेश दिलेले होते या कोर्टाने दिलेल्या आदेशाचे पालन न करता कोर्टाची अवहेलना केली जात आहे यात अतिक्रमण विभागाचे अधिकारी तर दोषी आहे याचं बरोबर महापालिकेचे आयुक्त सुध्दा दोषी असल्याचे दिसत आहे अधिवेशनात अतिक्रमणा बाबत आमदारांनी प्रश्न उपस्थित केला होता अतिक्रमण तातडीने काढण्याचे आदेशही महापालिकेला दिले होते महापालिकेच्या सभेत आमदार आणि मंत्री यांनी अतिक्रमणाबाबत प्रश्न उपस्थित केला होता यात अतिक्रमणा बाबत जनतेच्या तक्रारी असतांनाही कायम स्वरूपीं सरसकट अतिक्रमण का काढले जात नाही आणि अतिक्रमण पाडणारे येणार म्हणून अतिक्रमण करणा-यांना पुर्व कल्पना अतिक्रमण विभागाचे कर्मचारी कसे देतात हा संशोधनाचा विषय आहे महापालिकेच्या सभेत एक नियम








ठरवला गेला होता अतिक्रमण पाडतांना अतिक्रमण कारवाई न करण्याचा नगरसेवकांचा फोन आल्यास किंवा यांनी आदेश दिल्यास त्या नगरसेवकांचे पद रद्द होऊ शकते मग त्या महापालिकेने केलेले नियमांचे पालन महापालिका का करत नाही बाणेर,कोथरूड,बालेवाडी,कर्वे नगर, सिंहगड रोड एफसी रोडवरील काही अतिक्रमण पाडले आणि काही दबावाखाली अतिक्रमण पाडण्याचे थांबविले ही बाब योग्य आहे काय आज अतिक्रमण पाडले जाते आणि दुस-या दिवशी अतिक्रमण जैसे थे कसे होतात अतिक्रमण हे कोणाचेही असो हे अतिक्रमण सरगट पाडणे हा नियम असतांनाही अतिक्रमण विभाग कोणाच्या दबावाखाली सोडधरीचे राजकारण करत आहे सतत अतिक्रमणामुळे जनतेसह वाहन चालकांना तोंड द्यावे लागत असतांनाही यावर कायम स्वरूपीं तोडगा काढल्या जात नाही शहरातील अनेक अतिक्रमण राजकिय आश्रयाखाली सुरू आहे यात अनेक ठिकाणी अर्थकारणाने आणि राजकिय दबावापोटी अतिक्रमण पाडले जात नाही अतिक्रमण पाडणारे येतात म्हणून पुर्व कल्पना या अतिक्रमण करणा-यांना कशी मिळते यात अतिक्रमणा मधील काही कर्मचारी दर महिन्याला अर्थकारण करत असल्याचे दिसत आहे अतिक्रमण पाडणारे येतात मग यांना काही नगरसेवकांचा फोन येतो अतिक्रमण पाडणे थांबवा हा प्रकार केव्हा आणि कधी थांबणार शहरात काही ठिकाणी सायंकाळी सहा नंतर अतिक्रमण करणारे आपल्या हातगाड्या रोडवरचं किंवा पदपथावर लावतात हे चित्र अनेक ठिकाणी आहे कोर्टाचा आदेश, अधिवेशनात अतिक्रमण तातडीने काढण्याचा आदेश,महापालिकेत आमदार खासदार यांनी अतिक्रमण पाडण्या बाबत तातडीने कारवाई केली जावी हे सर्व आदेशांचे पालन महापालिका का करत नाही शेवटी या आदेशाचे पालन न करणारे स्थानिक क्षेत्रिय कार्यालया सगट महापालिकेचे आयुक्त सुध्दा दोषी आहे कारण शहरातील अतिक्रमणा बाबत गंभीर समस्या असतांनाही यावर कारवाई होत नाही परत परत त्याच ठिकाणी अतिक्रमण असे होतात हा एक संशोधनाचा विषय ठरतो रोज अतिक्रमणा बाबत वृत्तपत्रात रकानेच्या रकाने भरून वृत्त येत असतांनाही यावर कोणतीही कारवाई केलेली जात नाही.

## माणसाने निवृत्त झाल्यावर स्वत:साठी जगावे: यामिनी जाधव

**मुंबई । प्रतिनिधी**

आजकाल धकाधकीच्या जीवनात आपल्या स्वतःच्या आयुष्याकडे वेळ द्यायला मिळत नाही त्यामुळे माणसाने निवृत्त झाल्यावर आपल्यातील कलागुणांना वाव देऊन स्वतःसाठी जगावे असे जाहीर प्रतिपादन स्थापत्य समिती अध्यक्षा यामीनी जाधव यांनी कुलाबा डेपो येथील निवृत्त झालेल्या कर्मचारी बबीता पवार यांच्या निवृत्ती समारंभात केले. त्यापुढे म्हणाल्या, आजकाल धकाधकीचे जीवन खूप वाढले आहे त्यामुळे असंख्य रोग माणसाला जडतात. त्यामुळे माणसाला आपल्या आयुष्याकडे वेळ द्यायला जराही वेळ मिळत नाही. त्याचे संपूर्ण आयुष्य हे कामांमध्येच निघून जाते. त्यामुळे निवृत्ती झाल्यावर तरी माणसाने आपल्या स्वतःसाठी जगावे आणि आपल्या कुटुंबीयांना वेळ द्यावा. बबीता अजित पवार या निवृत्त झाल्या आहेत. त्या फार कष्टाने आणि मेहनतनी आजपर्यंत इथवर पोहोचले आहेत. त्यांचे लोकांसाठी करत असलेल्या समाजसेवेचे कार्य मी पाहिले



आहे. बीएसटीतील त्यांच्या सहकाऱ्यांना तसेच कोणालाही मदत करण्यासाठी त्या मागेपुढे पाहत नाही. आता त्या निवृत्त झाल्या असून संपूर्ण वेळ या समाजसेवेसाठी अर्पण करतील अशी मला आशा आहे. आमच्या डेपो मधील कर्मचारी बबीता पवार आज या नियत वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. त्यांना आमच्या सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की तुम्ही यापुढे निवडणुकीमध्ये उभे रहा आणि नगरसेवक म्हणून निवडून या. त्यांची लोकांप्रती असलेली सामाजिक भावना तसेच काम करण्याची भावना आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिले आहे. बेस्ट मधील कर्मचाऱ्याला कोणतेही संकट असो किंवा कोणतीही मदत हवी असल्यास बबीता पवार या नेहमीच अग्रेसर राहून त्या समस्या त्यांनी सोडविल्या आहेत. कामगारांचे प्रश्न देखील त्यांनी संबंधित अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करून सोडवले आहेत. त्यामुळे बबीता पवार या बेस्ट कामगारांमध्ये एक आदर्श होत्या. त्या आज त्यांच्या नियत वयामानुसार निवृत्त होत असून त्यांना आम्ही आमच्या बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वतीने आणि अधिकाऱ्यांच्या वतीने पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो अशी माहिती समय पालन विभागाचे सहाय्यक प्रशासकीय अधिकारी शांताराम कांबळे यांनी केले. या समारंभात सहाय्यक प्रशासकीय अधिकारी माधवी मोहिते, सर्व बेस्टचे अधिकारी, कर्मचारी आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गॅस सिलेंडर वितरणातील मनमानी कारभाराविरोधात उपोषण; प्रशासनाच्या आश्वासनानंतर तात्पुरते स्थगित!

**कर्जत । जयेश जाधव**

तालुक्यातील गॅस सिलेंडर वितरणातील मनमानी कारभारा विरोधात पोलीस मित्र संघटनेचे उपाध्यक्ष रमेश कदम यांनी केलेले उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर एका दिवसांतच तुतार्स स्थगित करण्यात आले. ग्राहकांना वेळेत गॅस सिलेंडर मिळत नसल्याने तसेच भारत गॅस एजन्सीच्या भोंगळ व मनमानी कारभारामुळे हे आंदोलन छेडण्यात आले होते.



रमेश कदम यांनी . २९ एप्रिल रोजी कर्जत येथील भारत गॅस एजन्सीसमोर सकाळी उपोषण सुरू केले होते. गॅस एजन्सीकडून ग्राहकांना वेळेत सिलेंडर मिळत नाही, बुकिंगनंतर विलंब होतो, तसेच सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि लग्नसमारंभासाठीही सिलेंडर उपलब्ध करून दिले जात नाहीत, अशा प्रमुख तक्रारी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या होत्या यामध्ये. ग्राहकांना एजन्सीसमोर पिण्याच्या पाण्याची, बसण्याची व निवाऱ्याची व्यवस्था नसल्याने ग्राहकांना तासनतास उन्हात उभे राहावे लागत होते, हि बाब त्यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी द्वारे मांडली होती याबाबत त्यांनी एक लेखी निवेदन तहसीलदार पुरवठा विभागाकडे सुपूर्द केले होते.अखेर उपोषणकर्ते रमेश कदम यांच्या या उपोषणाची दखल घेत पुरवठा अधिकारी रवींद्र दळवी यांनी कदम यांच्याशी चर्चा करून लेखी आश्वासन दिले. तसेच संबंधित गॅस एजन्सीकडूनही ग्राहकांच्या सोयीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे व सुधारणा करण्याचे आश्वासन देण्यात आले. इतर गॅस एजन्सीकडूनही याबाबत लेखी पत्र घेण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले.या प्रमुख मागण्यामध्ये गॅस सिलेंडर बुकिंगचा कालावधी ४५ दिवसांवरून२५ दिवसांवर आणण्याबाबतचा निर्णय केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने त्यासाठी काही कालावधी लागू शकतो. मात्र एजन्सी स्तरावर सुविधा सुधारण्याचे काम सुरू करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. प्रशासनाच्या या आश्वासनानंतर रमेश कदम यांनी आपले उपोषण तात्पुरते स्थगित केले असून, पुढील काळातही मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५